# – नागरी सहकारी पतसंस्था –

**प्राचार्य डॉ. पी.बी.कुलकर्णी**

**संस्थापक चेअरमन**

**श्री दत्त नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित., इस्लामपूर**
**जि.सांगली. मो. 9890660023 e-mail – dnsp.islampur@gmail.com**

**प्रास्ताविक –**

भारतातील सहकारी चळवळ ही जगातील सर्वात मोठया चळवळीपैकी एक व्यवस्था आहे. भारतीय अर्थव्यवस्थेच्या प्रत्येक क्षेत्रात सहकारी चळवळीने प्रचंड प्रमाणावर प्रगती केली आहे. प्रारंभीच्या काळात सहकारी चळवळ ही फक्त पतपुरवठा क्षेत्राशी निगडित होती. परंतु सद्यस्थिती पाहता तिने सामाजिक जाणिवेचे भान ठेऊन आज प्रत्येक क्षेत्रात आपला प्रागतिक स्वरुपाचा उत्तम ठसा उमटवला आहे असे दिसून येते. ही चळवळ वैकुंठभाई मेहता, धनंजयराव गाडगीळ, फ्रेडरिक निकोलसन यासारख्या अनेक दिग्गजांच्या नावाने ओळखली जाते. जास्तीत जास्त खेड्यातून सर्वदूर पोहोचलेली आणि जास्तीत जास्त ग्रामीण भागातील जनतेशी आपली नाळ प्रस्थापित केलेली चळवळ म्हणून या सहकारी अर्थकारण करणाऱ्या व्यवस्थेकडे पाहिले जाते. भारतात आणि विशेषतः महाराष्ट्रात सहकारी चळवळीने प्रामुख्याने ग्रामीण भागाचा विकास करुन अर्थव्यवस्था गतिमान बनविली आहे. नियोजित आर्थिक विकासात सहकारी चळवळीचे योगदान महत्वपूर्ण आणि मोलाचे आहे. सामाजिक आर्थिक उत्थानासाठी, दुर्बल घटकांच्या विकासासाठी आर्थिक विकासाचे प्रभावी साधन ( **effective instrument** ) म्हणून सहकारी चळवळीने आपली भूमिका गेले एक शतक पार पाडली आहे. ई. आर. बोवेन यांच्यामते **"सहकार हा निर्मितीचा कायमचा स्त्रोत आहे"**. ( **co-operation is the universal instrument of creation** ) सहकारी चळवळ ही औद्योगिक क्रांतीतून निर्माण झालेल्या परिस्थितीतून वाढीला लागली आणि ती भांडवलशाही विरुध्दची प्रतिक्रिया होती. सध्या जगात आस्तित्वात असलेले सहकार हे एकमेव महत्त्वपूर्ण ऐच्छिक संघटन आहे. भारतात सुध्दा आजमितिला १००% खेडी आणि ९२% लोकसंख्या (ग्रामीण) सहकाराच्या कक्षेत समाविष्ठ झाली आहे.

**सहकाराची भूमिका** – लोकशाही पध्दतीने आर्थिक नियोजन करताना सहकारी चळवळीने अत्यंत महत्त्वाची भूमिका पार पाडली आहे. आर्थिक विकासाचे साधन म्हणून नियोजनाला आजकाल अत्यंत महत्व प्राप्त झाले आहे. अर्थव्यवस्थेतील दुर्बलांना आर्थिक मदतीव्दारे सबल बनविणे, उत्पादनात वाढ करणे, आर्थिक विषमता कमी करणे, समतोल आर्थिक विकास साधणे, आर्थिक विकासाचा वेग वाढविणे, समाजाचे जीवनमान उंचावणे, विपणन आणि वितरण व्यवस्था, ग्राहक चळवळीव्दारा मार्गदर्शन यासारख्या उद्दिष्ठांची पूर्ती सहकाराच्या आणि नियोजनाच्या माध्यमातूनच करता येणे शक्य आहे. सहकारी चळवळ ही फक्त आर्थिक लाभाचा विचार करीत नसते तर त्याबरोबरच आपल्या सभासदांना सामाजिक लाभांचाही फायदा मिळवून देते. स्वावलंबन आणि परस्पर सहाय्य ही प्रवृत्ती लोकांपर्यंत पोहोचविण्याचे पवित्र कार्य सामाजिक संस्था, सहकारी संस्था पार पाडतात. बचतीला प्रोत्साहन, सहकारी बॅंकांचा विकास, शेती क्षेत्राचा विकास, लघु उद्योगाची प्रगती, प्रक्रिया उद्योगांचा विकास, रोजगार निर्मिती, शेतीमालाची विक्री व्यवस्था, निर्यातीत सहभाग, ग्राहक हित संवर्धन, समाजाच्या दृष्टिकोनातील बदल, महिला वर्गाचे कल्याण, राहणीमान उंचावण्यास मदत अशा माध्यमातून आर्थिक विकास साध्य करण्यात सहकारी चळवळीची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. त्यासाठी पतपुरवठा क्षेत्र आणि बिगरपतपुरवठा क्षेत्र ( **credit & non-credit sector** ) याव्दारे समाजाभिमुख विकासाची गंगोत्री म्हणजे

सहकारी चळवळ होय. यात प्रामुख्याने प्राथमिक शेती सहकारी पतसंस्था, दुग्ध सहकारी संस्था, सहकारी साखर कारखानदारी, नागरी सहकारी बँका, नागरी सहकारी पतसंस्था, ग्राहक सहकारी संस्था, सहकारी प्रक्रिया संस्था, विपणन संस्था, सहकारी गृहनिर्माण संस्था, राज्य सहकारी आणि मध्यवर्ती सहकारी बँका यांच्या माध्यमातून अर्थव्यवस्था प्रगत आणि गतीमान करणेचे कार्य सहकारी चळवळ करते.

**सहकारी पतपुरवठा** – सहकारी पतपुरवठा म्हटले की यात प्राथमिक शेती सहकारी पतसंस्था आणि बिगरशेती पतपुरवठा संस्था असे ढोबळ प्रकार पाडता येतात. ग्रामीण विकासाच्या धमन्या म्हणून प्राथमिक शेती सहकारी पतपुरवठा संस्थांकडे पाहिले जाते. सहकारी पतपुरवठयामुळे शेतक–यांना दिलासा मिळून काही प्रमाणात सावकारी पाशातून, जोखडातून मुक्तता होऊन त्यांचे रहाणीमान बदलले. यात अल्प मुदतीचा, मध्यम मुदतीचा आणि दीर्घ मुदतीचा शेतीसाठी केला जाणारा कर्जपुरवठयाचा समावेश केला जातो. भारतातील सहकारी पतपुरवठयाची रचना तयार करताना कृषीक्षेत्राची गरज लक्षात घेतली आहे. ग्रामीण पातळीवर संस्था, जिल्हा पातळीवरील मध्यवर्ती सहकारी बँका आणि राज्य पातळीवरील राज्य सहकारी बँका या त्रिस्तरीय रचनेतून शेतीला कर्जपुरवठा केला जातो. ग्रामीण भागाबरोबरच शहरी भागातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांना सुलभ व वाजवी दरात कर्जपुरवठा करणेसाठी शहरी भागात कर्जपुरवठा करण्याची तरतूद १९०४ च्या सहकारी कायद्याने केली होती. शहरी भागातील छोटे उद्योजक, लहान व्यावसायिक, किरकोळ व्यापारी, पगारदार लोक, मध्यमवर्गीय लोक, कारागीर यांना ही पतपुरवठयाची आवश्यकता होती. मॅकलगान समितीने शिफारशी करुन शहरी भागात सहकारी संस्थांनी बँकिंग कार्ये करावीत असे सूचित केले. यातून नागरी सहकारी बँका आस्तित्वात आल्या. यांना शिस्त लावण्यासाठी माधवदास समितीच्या शिफारशी महत्वपूर्ण ठरल्या. शहरी पतपुरवठयाचा विचार करताना त्यात महत्वपूर्ण भूमिका बजावणेत नागरी सहकारी बँका, नागरी सहकारी पतसंस्था आणि पगारदार नोकरांच्या पतसंस्था यांचा समावेश होतो. शहरी लोकांच्या आर्थिक गरजा भागविण्यासाठी, व्यवसायांचा विकास होण्यासाठी, रोजगार वाढीसाठी, बचतीचे एकत्रीकरण करण्यासाठी आणि शहरातील गरीब, मध्यमवर्गीय व्यावसायिकांचे जीवनमान सुधारणेसाठी शहरी पतपुरवठयाची भूमिका अत्यंत महत्वपूर्ण ठरते. शहरी जीवनातील विकासाभिमुख अर्थव्यवस्थेचा कणा म्हणून नागरी पतपुरवठयाकडे पाहिले जाते. सरकारी बँका, व्यापारी बँका आणि खाजगी बँकांपेक्षा सामान्य जनांना सहकारी अर्थपुरवठा करणा–या या संस्था जवळच्या, सोयीच्या, विश्वासाच्या आणि विश्वासार्हतेच्या वाटतात.

**नागरी सहकारी पतसंस्था** – भारतातील प्राथमिक शेती सहकारी पतसंस्थांनी जसा ग्रामीण विकासाचा चेहरामोहरा बदलून टाकला तशीच शहरी भागातील नागरी सहकारी पतसंस्थांची नागरी जीवनातील जडणघडण आणि रहाणीमान उंचावण्याची धडपड महत्वाची आहे. भारतात ब्रिटिश काळातील पहिली सहकारी संस्था, पहिला सहकारी कायदा होण्याअगोदर फेब्रुवारी १८८९ मध्ये बडोदा येथे विठ्ठल लक्ष्मण कवठेकर यांनी सुरु केली. या संस्थेने १८९३ मध्य "अन्योन्य सहकारी मंडळी" असे नांव घेतले. त्यानंतर महाराष्ट्र प्रांतात मुंबईमध्ये १९०५ साली दि बेटीगिरी को–ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी स्थापन झाली. त्यानंतर विविध प्रांतात नागरी सहकारी संस्था स्थापन झाल्या. १९३४ मध्ये देशाची मध्यवर्ती बँक स्थापन झाली आणि त्यांनी सहकारी पतसंस्थांची गरज स्पष्ट केली. १९४४ साली प्रा. डॉ. धनंजयराव गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखालील कृषी–अर्थ उपसमितीने शेतीतील अनुत्पादक कर्जाचा भार कमी करण्यासाठी सहकारी पतसंस्था योग्य आहेत असा निष्कर्ष दिला. १९४५ सालच्या सरय्या समितीने देखील सहकारी पतसंस्थांची शिफारस केली. देश पातळीवरील नागरी सहकारी संस्था विकासासाठी गोरवाला समितीपासून ते शिवजीराव पाटील समितीच्या शिफारशीनुसार सहकारी पतसंस्थांचा विकास नागरी भागामध्ये झालेला दिसतो. १९९१ च्या खाजगीकरण, जागतिकीकरण आणि उदारीकरणाच्या काळात सहकारी चळवळीच्या विकासावर प्रतिकूल परिणाम झाला. मोठया प्रमाणावर

नागरी आणि ग्रामीण भागातील सहकारी पतसंस्था बंद पडल्या.  काही राज्यात आणि राज्यातील काही भागात नागरी आणि ग्रामीण सहकारी पतसंस्था विलिन कराव्या लागल्या परंतु स्पर्धात्मक बाजारात टिकण्याचे सामर्थ्य प्राप्त करुन अनेक पतसंस्थांनी आपले अर्थकारण सुधारुन फिनिक्स पक्षाप्रमाणे पुनश्च एकवार भरारीकडे वाटचाल करण्याचा प्रयत्न केला.

**महाराष्ट्रातील प्रगती** – भारतात सहकारी चळवळीच्या बाबतीत महाराष्ट्राचा क्रमांक एक नंबरवर आहे. बँका, साखरउद्योग, प्रक्रियाउद्योग, दुग्ध व्यवसाय आणि पतपुरवठा सर्वच बाबतीत महाराष्ट्रात सहकाराची प्रगती झाली आहे. नवीन आर्थिक धोरणांमुळे आणि शासकीय तटस्थतेमुळे महाराष्ट्रात २१ व्या शतकाच्या पहिल्या दशकात सहकारी पतपुरवठा खूपच विस्कळित झाला होता. तुलनात्मक आकडेवारीचा लेखाजोखा विचारात घेतला तर २००० सालानंतरची प्रगतात्मक आकडेवारी फारशी समाधानकारक नाही असे खेदाने म्हणावे लागते पण सहकार अयशस्वी झाला आहे तरीही त्याची प्रगतीकडे वाटचाल झाली पाहिजे हे तत्व डोळयासमोर ठेवून नागरी सहकारी पतसंस्थांची वाटचाल सुरु आहे. नागरी सहकारी पतसंस्था अल्प उत्पन्न गटातील व्यक्तिंना लाभ देतात, स्वयंरोजगारास मदत करतात, व्यावसायिकांना मदत करतात., सामाजिक सेवा पुरवितात, दुर्बलांना वंचितांना न्याय देण्याचा प्रयत्न करतात पण  इतर संस्थांशी स्पर्धा, पुरेशा निधीचा अभाव, सदोष कर्ज धोरण, अनुत्पादक कर्जावर भर, सभासदांचा उदासीनपणा, गैरव्यवहार, भ्रष्टाचार, राजकीय हस्तक्षेप ही आणि अशी अनेक कारणे आहेत की जी नागरी सहकारी पतसंस्थांपुढे अडचणी उभ्या करतात. महाराष्ट्रातील नागरी सहकारी पतसंस्थांची प्रगती जर पाहीली तर १९७१ पासून २००१ पर्यंतची संस्थांची, सभासदांची, भागभांडवलाची, ठेवींची, कर्जाची, नफ्यातील संस्थांची आकडेवारी चढत्या प्रगत क्रमाने दिसते. परंतु २००५ पासूनची आकडेवारी उतरती कळा आणणारी आहे. सांगली, सातारा, कोल्हापूर या पश्चिम महाराष्ट्रातील जिल्ह्यातून पतसंस्थांची वाताहात झाली. बंद पडण्याचे किंवा अवसायनात निघण्याचे प्रमाण वाढले. ठेवीदार हवालदिल झाले. पतसंस्थांची विश्वासार्हता कमी झाली. गेल्या काही वर्षात ही परिस्थिती थोडीशी आशादायक बनली आहे.

**पतसंस्थांपुढील आव्हाने** – १९९१ च्या आर्थिक उदारीकरणाच्या धोरणानंतर बँकिंग क्षेत्रात घडून आलेल्या आर्थिक घडामोडीमुळे सहकार क्षेत्रात अनेक आव्हानांना सामोरे जावे लागले. वाढत्या स्पर्धेच्या काळात नागरी सहकारी पतसंस्थांना आपले स्थान केवळ न टिकविता इतर बँकांच्या बरोबरीने किंबहुना त्याहीपेक्षा अधिक विकास घडवून आणण्यासाठी दुर्बल स्थाने आणि धोके यावर मात करुन संधीचा फायदा घेणेची गरज आहे. वित्तिय संस्था आणि इतर बँकाशी स्पर्धा, भांडवलाची कमतरता, ढासळणारी विश्वासार्हता, व्यवसायातील सातत्य व विकास, कुशल कर्मचारी वर्ग, वाढता निधीचा खर्च व ठेवीचे घटते प्रमाण, आधुनिक बँकिंग सुविधा देणेची असमर्थता, महिलांचा कमी सहभाग, मर्यादित कार्यक्षेत्र, असमाधानी भौतिक सुविधा या आणि अशा सारख्याच अनेक आव्हानांना पतसंस्थांना तोंड द्यावे लागते. एवढेच नव्हे तर बुडणा–या आणि भ्रष्टाचारामुळे अवसायनात निघणा–या पतसंस्थांच्या वाढत्या प्रमाणामुळे आज चांगल्या चाललेल्या संस्थांकडेही बघण्याचा दृष्टीकोन बदलू लागला आहे. निकोप स्पर्धा न राहता आकर्षक व्याजदरांना भुलून भलतीकडेच पैसे गुंतवणूक करुन भविष्यात पश्चाताप करणेची वेळ येत आहे. काही प्रमाणात शासनाकडून गेल्या दोन वर्षात नीरक्षीर न्यायाने चळवळीचे पारदर्शीकरण चालू आहे. पण त्यालाही सकारात्मक प्रतिसादाची आवश्यकता आहे. सभासदांनी पतसंस्थेचा ताळेबंद, ऑडिट वर्ग, गेल्या पाच वर्षाचा किमान लेखाजोखा, संचालक मंडळ आणि त्यांची निस्पृहता, विश्वासार्हता, लाभांशाची दहा वर्षाची स्थिती, वाढती प्रगतीची रचना या बाबींचा गांभीर्याने विचार करुन व्याजदरापेक्षा ठेवी परत मिळण्याची हमी दिलासा महत्वाची आहे. अर्थात पतसंस्थांकडूनही सकारात्मक प्रतिसादाची अपेक्षा आहे. पारदर्शीपण, विश्वासार्हता, सातत्य, परिणामकारकता, सोयीसुविधा, व्यवस्थापन प्रणाली, कमीतकमी राजकीय हस्तक्षेप, नियोजन आणि नियंत्रण, कुशल आणि पात्र महिलांचा सहभाग, महिला सबलीकरण, जाहीरात माध्यमांचा वापर, मोठे व्यवहार चेकने करणे,

प्रगत तंत्रज्ञानाचा वापर, पारदर्शक व्यवहार आणि जनमानसातील प्रतिमा सुधारली तर आव्हानांना सामोरे जाणे सुलभ होईल.

**नागरी पतसंस्थांचे स्वॉट ( SWOT ) विश्लेषण** – स्वॉट विश्लेषण हे तंत्र कोणत्याही संस्थेची सबल स्थाने ( **strength** ), दुर्बल स्थाने ( **weaknesses** ), संधी ( **opportunity** ) आणि धोके ( **threats** ) संबंधी माहिती देतात. नागरी सहकारी पतसंस्थांचे सध्याच्या काळातील विश्लेषण केल्यास पुढील घटक स्पष्ट होतात.

**अ)** सबलस्थाने पाहिली तर मर्यादित कार्यक्षेत्र, व्यक्तिगत संपर्क, सांघिक भावनेतून अडचणीवर मात, छोटया उत्पन्नधारकांना प्राधान्य, मर्यादित जोखीम, जलद व कमी कागदपत्राव्दारे अर्थसहाय्य, छोटया स्वरुपातील बचतीची सवय, वैयक्तिक गरजांची पूर्तता करणेसाठी कर्जे, परतफेडीची सुलभ यंत्रणा यांचा समावेश करता येईल.

**ब)** दुर्बलस्थाने पाहिली तर मर्यादित भौतिक सुविधा, अव्यवसायिक व्यवस्थापन, सभासदांकडून दुर्लक्ष, लोकशाही तंत्रातील तृटी, कर्मचारी वर्गास प्रशिक्षणाचा अभाव, सरकारी हस्तक्षेप, बदलणारे व्याजदर, पारदर्शकतेचा अभाव, अधिक स्वायत्तता, दैनंदिन कामकाजातील तृटी यांचा समावेश करता येतो.

**क)** संधी म्हणून सभासदांची संख्या वाढविणे, अर्थसहाय्याबरोबर विमा, पेन्शन इ. सेवा, विविध राज्यामध्यू शाखा विस्तार, कर्मचा-यांना प्रोत्साहन व प्रशिक्षण, फी आधारित सेवा, सभासदांची विश्वासार्हता वाढविणे, जलद कर्ज मंजुरी व इतर सेवा, प्रगत तंत्रामुळे अधिक संपर्क, स्पष्ट व प्रेरित उद्दिष्टे, योग्य लेखापरिक्षण व पारदर्शकता आणता येईल.

**ड)** धोके पहाताना राजकारणाचा वाढता हस्तक्षेप, सभासदांचे अज्ञान, स्वार्थीवृत्ती आणि अनैतिकता, नवीन तंत्रज्ञानाचा अपूरा वापर, आर्थिक घोटाळे, नवीन आर्थिक सहाय्य करणा-या संस्थांशी स्पर्धा, ढासळणारी विश्वासार्हता, व्यवस्थापनाची दुर्लक्षित गुणवत्ता आणि एकूणच सर्वांची उदासिनतेची प्रवृत्ती याचा विचार महत्वपूर्ण ठरतो.

**कर्ज व्यवहार व्यवस्थापन** – नागरी सहकारी पतसंस्थेच्या कार्यात कर्ज व्यवहारास अनन्य साधारण महत्व आहे. यावर संस्थेचे यश, नफा, वृध्दी अवलंबून आहे. यासाठी कर्ज वितरणाचे शास्त्रोक्त पध्दतीने व्यवस्थापन होणे गरजेचे आहे. नागरी सहकारी पतसंस्था या प्रामुख्याने गरीब, दुर्बल घटकांना पतपुरवठा करुन त्यांचे पत निर्माण करण्याचे महत्त्वाचे कार्य करतात. सध्याच्या स्पर्धात्मक युगामध्ये संस्थेची व्यवसायवृध्दी करणे बरोबरच व्यावसायिक दृष्टीकोन ठेवून कर्ज व्यवहार करणे संस्थेच्या हिताचे असते. कर्ज व्यवहाराची तत्त्वे पाहिली तर त्यात निधी सुरक्षितता, तरलता, नफाक्षमता, कर्ज व्यवहार हेतू आणि तारण ही पंचपदी अत्यंत महत्त्वाची आहे. तर कर्ज व्यवहाराचे धोरण हा सुध्दा स्वतंत्र विषय आहे. कारण प्रत्येक संस्थेने आपले कर्ज व्यवहाराचे धोरण स्वतंत्रपणे ठरविले पाहिजे. सदरचे धोरण संचालक मंडळाने मंजूर केले असले पाहिजे. आवश्यकतेनुसार सुधारणा, दुरुस्त्या केल्या पाहिजेत. या धोरणात कर्ज कोणास द्यावयाचे, वैयक्तिक व सामुहिक कर्ज मर्यादा, तारण मालमत्तेचा तपशील, कर्ज मुदत, हप्ता पध्दती, कर्ज मूल्यांकन पध्दत, दुरावा (**Margin** ), व्याजदर, वितरणाचा कालावधी, तारणाचा विमा, इतर कागदपत्रे असे सर्व समावेशक धोरण ठरविण्यात यावे. कर्ज व्यवहाराचे धोरण सविस्तर व पारदर्शक ठरविलेस संस्थेच्या आर्थिक हिताचे असेल. कर्जव्यवहार व्यवस्थापन करताना कर्जमंजुरीपूर्वीचे कार्य, कर्जवितरण पध्दती, कर्मचा-यांची कर्ज विषयक जबाबदारी, कर्ज वितरणाचा सहामाही आढावा यांनाही तितकेच प्राधान्या द्यावे. अशा सर्वसमावेशक बाबींचा कर्जव्यवहार व्यवस्थापनात विचार केला तर पारदर्शक कर्ज व्यवस्थापनाचा आपणास निश्चितच लाभ होईल.

**समारोप –**

नागरी सहकारी पतसंस्थांची भूमिका मांडताना भारतीय अर्थव्यवस्थेची सहकारी चळवळीची परिस्थिती, आर्थिक विकासातील आणि नियोजनातील सहकारी चळवळीचे योगदान, भारतीय अर्थव्यवस्थेतील सहकारी पतपुरवठयाची आवश्यकता आणि दिशा, भारतातील नागरी सहकारी पतसंस्थांचा उगम, विकासख आवश्यकता, योगदान यांचा उहापोह करण्याची एकूण प्राप्त परिस्थितीतील आवश्यकता याचे नवीन सहकारी संघटकांना ज्ञान होणे गरजेचे आहे. उभारीच्या नव्या नेतृत्त्वाला आणि महिला सबलीकरणाला याबाबत ज्ञात होणे नितांत आवश्यक आहे. आकडेवारीच्या तपशिलात न जाता अगदी थोडक्यात महाराष्ट्रातील नागरी सहकारी पतसंस्थांचा धावता आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे. माझ्यादृष्टीने सर्वात आजच्या घडीला अत्यंत आवश्यक असलेली बाब म्हणजे आजची पतसंस्थांपुढील आव्हाने आणि ती सक्षमतेचे पेलण्याची २१ व्या शतकाची कुवत, अत्यंत तांत्रिक पण सोप्या भाषेत मांडण्याचा मी प्रयत्न म्हणजे नागरी सहकारी पतसंस्थांचा सर्वसमावेशक तंत्रशुध्द अभ्यास आणि त्या अनुशंगाने येणारी बाब म्हणजेच स्वॉट विश्लेषण. यातून सर्वसामान्यांना, सभासदांना, ठेवीदारांना, सहकारचे अभ्यासकांना नागरी सहकारी संस्थांची बलस्थाने, दुर्बलस्थाने, संधी आणि धोके कळावेत हीच लिखानाची प्रेरणा. कर्जव्यवहारांचे व्यवस्थापन हा दुर्लक्षित असणारा पण गरजेचा आणि अत्यंत जिव्हाळयाचा विषय. या मुद्यांना स्पर्श करुन पतसंस्थानी आपले कर्जधोरण ठरविले तर त्यांचे बहुतांशी वितरणाचे आणि कर्जवसुलीचे प्रश्न आपोआप निकाली निघतील. समारोपात मी एवढेच म्हणेन की विकासात्मक, सकारात्मक, पारदर्शी, निष्ठावान दृष्टिकोन ठेवला, विश्वासार्हता संपादन केली तर नागरी सहकारी पतसंस्थांना भरारी घेऊन क्षितिजापलीकडील विश्वाला गवसणी घालणे अशक्य तर नाहीच पण ते सुलभतेने शक्य होईल. **So Sky is also not the Limit.**

दैनिक केसरी